# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) या शहरात ठिकठिकाणी सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्याबाबत**

**(१) ६८ (२३-१२-२०१४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) या शहरात ठिकठिकाणी सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामामुळे व ती पुर्ण करण्यात आली नसल्यामुळे शहरात सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण होऊन नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रोगाची लागण होवूनही नगराध्यक्षांचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांची अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करुन नागरिकांना धुळीपासून होत असलेला त्रास रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापी, अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने भुयारी गटार योजना JNNURAM मार्फत व पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत आणि प्रत्येक वॉर्डमध्ये रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण करणे इत्यादी कामे सन २०१६ पर्यंत पूर्ण होणार आहेत. सदरची कामे सुरु असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे.

तथापि, उपरोक्त कामामुळे रस्त्यावर साचलेली धुळ व राबीट उचलण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत तत्परतेने करण्यात येते. परंतु या धुळीमुळे कोणत्याही रोगाची लागण झालेली नाही तसेच असे कोणतेही प्रकरण नगरपरिषदेच्या निदर्शनास आढळून आलेले नाही. नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने रस्त्यावर धुळ साचु नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचना संबंधित ठेकेदारांना नगरपरिषदेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (पूर्व) जि.ठाणे शहरातील जरीमरी आई देवस्थानाला**
**'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्याबाबत**

**(२) ६६६४ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) जि.ठाणे शहरातील जरीमरी आई देवस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी वारंवार पत्र देवुनही महानगरपालिका मंदिर परिसरात भाविकांसाठी कोणत्याही विशेष सुविधांकडे लक्ष देत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) या देवस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

मंदिर परिसरात भाविकांसाठी पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, रस्ते तसेच तिसाई देवीच्या जत्रेवेळी वापरण्यात येणारा पालखी मार्गाचा कॉक्रिटीकरण रस्ता इत्यादी अत्यावश्यक सुविधा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) शासनास प्राप्त झालेला प्रश्नाधिन प्रस्ताव तपासणी सूची नुसार तपासून प्रशासकीय मान्यतेसह विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत शासनास सादर करण्याबाबत दि. १० एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेएनपीटी यार्ड येथे प्रवेशासाठी कंटेनर तसेच इतर वाहनांना लागणारे वाहन**
**परवाने बनावटरित्या बनविण्यात येत असल्याबाबत**

**(३) ७१५३ (७-४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी यार्ड येथे प्रवेशासाठी कंटेनर तसेच इतर वाहनांना लागणारे वाहन परवाने बनावटरित्या बनवून शासनाची फसवणूक करणा-या दोघांना पनवेल शहर पोलिसांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात अटक केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले व कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा प्रकारे बनावट वाहन परवान्यांचे प्रकार रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४५३/२०१४, भा.दं.वि. कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) ही बाब परिवहन विभागाशी संबंधीत असल्यामुळे याबाबत परिवहन विभागास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

---

**अंबरनाथ (पश्चिम) (जि.ठाणे) येथील नगरपालिकेच्या बहुभाषिक शाळेच्या धोकादायक वास्तुचे छत कोसळल्याबाबत**

**(४) ८१४३ (०७-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (पश्चिम) (जि.ठाणे) येथील नगरपालिकेच्या बहुभाषिक शाळेच्या धोकादायक वास्तुचे छत कोसळल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेची धोकादायक वास्तु नगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे कोसळल्याचा आरोप स्थानिक पातळीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) अंबरनाथ नगरपरिषदेने सन २००४ साली खुटंवली येथे शाळेची इमारत बांधली असून त्यालगत असलेल्या जुन्या बैठी इमारतीचा उत्तरेकडील काही भाग दिनांक १५.१.२०१५ रोजी पडलेला आहे, ही बाब खरी आहे.

परंतु सदरची जुनी बैठी इमारत सन २००५ पासून बंद असून त्यामध्ये कोणतेही वर्ग भरत नसल्याने कोणतीही जिवित अथवा वित्तीय हानी झालेली नाही.

सदर जूनी इमारत संपूर्णपणे निष्कासीत केली आहे. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधकाम झाले असून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधकाम झाले असून त्या ठिकाणी शाळा सुरु आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील भोसरी, दिघी, मोशी, चऱ्होली या भागातील रेडझोन परिक्षेत्रामुळे नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(५) ८३३५ (०६-०७-२०१५). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भोसरी, दिघी, मोशी, चऱ्होली या भागातील रेडझोन परिक्षेत्रामुळे नागरीकांना मुलभूत सुविधा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्र रेडझोन मुक्त करुन तेथील नागरिकांना सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१५) :**(१) भोसरी, दिघी, मोशी व च-होली मधील रेड झोन भागात रस्ते, वीज, पाणीपुरवठा, मलनि:सारण इत्यादी सुविधा पूर्वीपासून दिलेल्या असून त्या कायम आहेत. त्यामध्ये नव्याने वाढ करण्यात येत नाही.

(२) सदर बाब ही केंद्र शासन यांच्या स्तरावरील धोरणात्मक बाब आहे. सदर बाब केंद्र शासन यांच्या निर्णयावर अवलंबून आहे.

(३) वरील प्रमाणे.

---

## पुज्य चालिया साहेब मंदिर उल्हासनगर या मंदिराची तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकास करणेबाबत

**(६) ८६१७ (०६-०७-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील पुज्य चालिया साहेब मंदिराच्या परिसराचा तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकसित करण्याचा प्रस्ताव उल्हासनगर महापालिकेने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हे काम लवकरात लवकर पुर्ण व्हावे याकरिता कोणती पाऊले उचलली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रस्ताव तापसणी सूची प्रमाणे अद्यावत करुन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे मार्फत शासनास सादर करण्याबात दि. १ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील बेकायदेशीर बांधकामांना निर्बंध घालण्याकरिता धोरण ठरविण्याबाबत

**(७) १०३३२ (०६-०४-२०१५). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील ग्रामीण भागातील बेकायदेशीर बांधकामांना निर्बंध घालण्याकरिता धोरण ठरविण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती, सदर समितीने राज्यातील ११ जिल्ह्यात प्रादेशिक योजना (Regional Plan) नसल्यामुळे अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाले आहेत म्हणून त्यास आळा घालण्याकरिता प्रादेशिक योजना असलेल्या भागातील अवैध बांधकाम नियमित करण्याकरिता अहवालातील परिच्छेद क्रमांक ८.४.२ मध्ये अनेक तरतूदी सूचविलेल्या आहेत, तसेच परिच्छेद ८.४.४ मध्ये प्रादेशिक योजना नसलेल्या भागातील अवैध बांधकाम नियमित करण्याकरिता परिच्छेद क्रमांक ८.४.२ मध्ये सूचविलेल्या तरतुदी लागू करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी असे नमूद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनाने स्विकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारशीप्रमाणे अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येतील व शासन मान्यता देईल अशा अटी, शर्ती व निकषाची पुर्तता करणाऱ्या अनधिकृत बांधकामे नियमित (Compounding) करणे शक्य व्हावे यासाठी अधिनियमात नविन तरतुद समाविष्ट करण्यात येईल असा निर्णय दिनांक ५ डिसेंबर,२०१४ रोजी झालेल्या मंत्री परिषदेमध्ये घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय,

राज्यातील ग्रामीण भागातील बेकायदेशीर बांधकामांना निर्बंध /आळा घालण्यासंबंधी उपाययोजना करण्यासंदर्भात दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार ज्या ठिकाणी प्रोदशिक योजन मंजूर झालेल्या आहेत त्यांच्या हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी तसेच विकास परवानगी प्रकरणांच्या अधिकारांचे स्पष्टीकरण होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतूदींमध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ मध्ये अधिनियम पारीत करण्यात आलेला आहे,

दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत मान्य झालेल्या प्रस्तावानुसार ज्या क्षेत्रासाठी प्रादेशिक योजना प्रसिध्द झालेली नाही अथवा अंतिम मंजूर झालेली नाही, अशा ठिकाणची अनधिकृत बांधकामांबाबत कारवाई करण्यासाठी/अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामध्ये सुधारणा करण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही ग्रामविकास विभागाकडे सुरु आहे,

(४) लागू नाही.

---

**नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(८) ११८४० (०९-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने निबंधक भागीदारी संस्था मुंबई यांचेकडून दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी अभिप्राय मागविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार नाशिक येथे सदर कार्यालय सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत निबंधक, भागीदारी संस्था यांचे अभिप्रायानुसार याबाबतचा निर्णय शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांच्या सुरक्षिततेबाबत**

**(९) १२४१३ (१०-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीत सुमारे ३५०० पेक्षा अधिक उद्योजक असलेल्या उद्योजकांना खंडणीखोरांचा होणारा त्रास, कंपनीचे बांधकाम करत असतांना बांधकाम साहित्य घेण्यापासून कामगार भरतीपर्यंत जबरदस्ती करणे, भंगार विक्रीतही हिस्सा मागणी, भंगार चोरणे, इत्यादी कारणांमुळे उद्योजकांमध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याने या त्रासापासून मुक्तता यावी याकरिता जुलै, २०१४ च्या सुमारास पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना भेटून निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार उद्योजकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून याबाबत तक्रारी प्राप्त होताच त्याची तातडीने दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत सर्व संबंधित पोलीस स्टेशनला पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या स्तरावर आदेश देण्यात आले आहेत.

(३) नवी मुंबई क्षेत्रात रबाळे व महापे या दोन्ही ठिकाणी औद्योगिक क्षेत्राचा परिसर असून सदर परिसरात कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने उद्योजकांना त्रास देणा-या लोकांकडून सुरक्षेच्या दृष्टीने दोन्ही परिसरात पोलीसांची गस्त वाढविण्यात आली आहे.

एमआयडीसी परिसरातील कंपनीच्या मालकांबरोर बैठका घेण्यात आल्या असून त्यांच्या अडचणी समजून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.

कंपनी मालकांना सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्या कंपनीत तसेच कंपनीच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे लावणबाबत व सुरक्षारक्षक नेमण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. उद्योजकांकडे खंडणी मागितली असेल किंवा अन्य कुठल्याही प्रकारचा त्रास असेल तर उद्योजकांनी न घाबरता तात्काळ संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार करण्याबाबत देखील सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील कचरा डेपोची सर्व आरक्षणे बेकायदेशीर असून पर्यावणालाही मारक असल्याबाबत

**(१०) १३३३२ (०७-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील कचरा डेपोची सर्व आरक्षणे बेकायदेशीर असून पर्यावरणालाही मारक असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षणे रद्द करावीत या मागणीसाठी शहर विकास आराखडा अन्याय निवारण कृती समिती आंदोलन करण्याच्या तयारीत असून त्यासाठी त्यांनी इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

नाशिक शहराची प्रारुप सुधारित विकास योजना दिनांक ०४-१० जून २०१५ रोजीच्या राजपत्रामध्ये नोटिसीद्वारे जनतेच्या हरकती / सूचनांसाठी प्रसिध्द झालेली असून यामध्ये कचरा डेपोचे नवीन आरक्षण दर्शविण्यात आले आहे तसेच याशिवाय विद्यमान कचरा डेपोच्या विस्तारीकरणासाठी एक आरक्षण प्रस्तावित आहे.

(२) शहर विकास आराखडा अन्याय निवारण कृती समिती, नाशिक यांनी याबाबत दिनांक २९.०१.२०१५ रोजी निवेदन दिले आहे. त्या आंदोलनाचा इशारा दिल्याचे दिसून येत नाही.

(३) सदर प्रारुप विकास येजना शासनास सादर झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जळगांव शहरातील महामार्गावरील समांतर रस्त्याच्या कामाबाबत

**(११) १४०२२ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील महामार्गावरील समांतर कामासाठी केंद्र शासनाकडून निधीची मागणी केली आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :**(१), (२) व (३) या कामासाठी जळगाव महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे निधीची मागणी केलेली नाही.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी महामार्गाच्या समांतर रस्त्याचे काम महापालिकेने त्यांच्या स्वनिधीतून करण्याचे आदेश दिले आहेत. या कामांसाठी रु.४५ कोटी खर्च अपेक्षित असून महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने हे काम महानगरपालिका फंडातून करणे शक्य होत नाही.

---

### जळगांव महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना नियमित पगार व पेन्शन मिळत नसल्याबाबत

**(१२) १४०२३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना नियमित पगार व पेन्शन मिळत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना नियमित पगार व पेन्शन मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१), (२), (३) व (४) तत्कालीन जळगांव नगरपालिकेने विविध विकास कामांसाठी हुडको व जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड महानगरपालिकेकडून विहित मुदतीत होऊ शकली नाही. परिणामी कर्ज परतफेडीसंदर्भात मा.उच्च न्यायालयाकडील याचिका क्र.१०३६६/२०१४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार हुडको या वित्तीय संस्थेस दरमहा तीन कोटी व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडील याचिका क्र.१७१७/२००३ मधील आदेशानुसार जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दरमहा एक कोटी इतकी रक्कम अदा करावी लागत आहे. तसेच विविध करणामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील घट झाली आहे.

या कारणास्तव महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन व सेवानिवृत्तीवेतन अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. सद्यस्थितीत माहे फेब्रुवारी, २०१५ चे वेतन आणि सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैशिष्ट्यपुर्ण कामांच्या निधीबाबत**

**(१३) १४४१८ (०७-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने येथील नागरीकांना विविध सोई सुविधा प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिकेच्या हद्दीतील काही वैशिष्ट्यपूर्ण कामांची एकूण २३ विशेष कामांचे प्रस्तावीत यादीतील कामांना शासनाकडून "विशेष निधी" अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधीची मागणीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जून, २०१४ रोजी तत्कालिन उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाद्वारे केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू मागणी प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरीकांना सोयी पुरवितांना महापालिकेस प्रचंड आर्थिक ताण पडत आहे. त्यासाठी महापालिकेच्या हद्दीतील काही वैशिष्टयपूर्ण कामे करण्यासाठी एकूण २३ कामांना शासनाकडून ''विशेष निधी'' अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केलेली आहे.

(३) सन २०१४-१५ या वर्षा मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेस वित्तीय मर्यादा विचारात घेता वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत ''विशेष निधी'' उपलब्ध करुन देता आला नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीरामधील कामगारांना लाभ मिळण्याबाबत**

**(१४) १६६८५ (१२-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीरामधील कामगारांना कामगार कायदयाचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचवा वेतन आयोग लागू केला असला तरी त्या आयोगांनुसार महागाई भत्ता दिला जात नाही तसेच हंगामी कर्मचा-यांना कायम करण्यात आल्यानंतर त्यांना महागाई भत्ता दिला जात नाही या मागण्यांसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचा-यांनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्या त्यादरम्यान बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंदीराला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचे आदेश अप्पर कामगार आयुक्तांनी सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांना दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी दिले आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, सहाय्यक कामगार आयुक्त यांनी केलेल्या पाहणीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील तुरुंगात सीसीटीव्ही बंद असल्याचे तसेच मोबाईल जॅमर कार्यान्वित नसल्याबाबत**

**(१५) १६९४९ (१६-०९-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक तुरुंग परिसर व अंतर्गत सुरक्षा कडक करण्याच्या उद्देशाने सीसीटीव्ही लावण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत परंतू अकोला येथील तुरुंगाला मा.गृह राज्यमंत्री यांनी भेट दिली असता तेथील सीसीटीव्ही बंद असल्याचे तसेच मोबाईल जॅमर कार्यान्वित नसल्याचे आढळून आल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश गृह राज्यमंत्री महोदयांनी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग-२ बाबत कोणती कार्यवाही केली तसेच राज्यातील इतर कारागृहात सीसीटीव्ही व मोबाईल जॅमर कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. अकोला जिल्हा कारागृहात जिल्हाधिकारी, अकोला यांचे मार्फत प्राप्त निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले होते. परंतु सदर सीसीटीव्ही पाहण्याकरिता आवश्यक मॉनिटरची व्यवस्था नव्हती. मोबाईल जामर कार्यान्वित होते.
(२) सीसीटीव्ही कॅमेरेने चित्रित होणारे चित्र पाहण्याची सुविधा उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या.
(३) मॉनेटरची व्यवस्था करण्यात आलेली आहे व मोबाईल जामर कार्यान्वित होते. मुंबई, तळोजा, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सीसीटीव्ही बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहेत. नाशिक व नागपूर मध्यवर्ती करागृहात सीसीटीव्ही यंत्रणे करिता अनुदान प्राप्त करुन घेण्यात येत आहे.
सर्व कारागृहातील महत्वाच्या बरॅक्स मध्ये मोबाईल जामर बसविण्यात येत असून कारागृहाचा परिसर खूप मोठा असल्याने सर्व परीसरात एकाच वेळी जामर बसविणे शक्य नसून टप्प्या टप्प्याने प्राप्त अनुदानानुसार सुरक्षा उपकरणांची खरेदी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली येथील मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिसवली गावात एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर एका नराधमाने बलात्कार केल्याबाबत**

**(१६) १७१५७ (१६-०९-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली येथील मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिसवली गावात एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर एका नराधमाने बलात्कार केल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) मानपाडा पोलीस स्टेशन येथे आरोपी विरुध्द गु.र.नं. १७८/२०१५ भा.द.वि. क्र. ३६३, ३६७ सह लैंगिक अपराधा पासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून, सदर गुन्ह्यांत आरोपीस अटक करुन मा.न्यायालयात दोषारोप पत्र पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील कालावत पात्रातील वाळू उपसा चोरी प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(१७) १७७५१ (१२-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील कालावत पात्रातील वाळू उपसा चोरी प्रकरणी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आचरा प्रभारी मंडळ अधिकारी यांनी गुन्हा दाखल करण्यास नकार दिला व वाळू उपसा करणा-यास पाठीशी घातले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) कालावत पात्रातील वाळुउपसा चोरीप्रकरण हे सिंधुदुर्ग जिल्ह्यात असून जिल्हाधिकारी सिंधूदुर्ग यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत तहसीलदार मालवण यांना पत्र पाठविले होते.
(२) व (३) या प्रकरणी मालवण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३८/२०१५, भां.द.वि. कलम ३७९,३५३,१४३,१४७,११७,१५२,५०४ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ३१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर पुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

---

**मौ.वरकोंडवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या गावातील तेरेखोल नदी पात्रात श्री. शिवाजी धोंडू सावंत यांचा मृत देह आढळून आल्याबाबत**

**(१८) १७७७० (१२-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. वरकोंडवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या गावातील तेरेखोल नदी पात्रात श्री.शिवाजी धोडूं सावंत यांचा दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मृत देह आढळून आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांना खूनाचा तपास अद्याप लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खूनाचा तातडीने तपास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सदर प्रकरणी दिनांक ०१ मे, २०१५ रोजी तेरेखोल नदी पात्रात एका पुरुषाचे प्रेत दिसून आले. त्यावरुन पोलीस स्टेशन , सावंतवाडी येथे दिलेल्या खबरीवरून पोलीस स्टेशन, सावंतवाडी येथे आकस्मित मृत्यू क्र. २६/२०१५ दिनांक ०१ मे, २०१५ रोजी दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये सदर व्यक्तीचा गळा आवळून खून केल्याबाबत नमूद करण्यात आले आहे. या अनुषंगाने मयत व्यक्तीच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, सावंतवाडी येथे गु.र.क्र. ४३/२०१५, भां.द.वि. कलम ३०२,२०१,३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

या प्रकरणी २ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींनी गुन्हा कबुल केला आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

---

## मराठवाडयातील पर्यटन स्थळांवर पाणी साठवण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(१९) १८०३६ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील पर्यटन स्थळांवर पाणी साठवण्याची व्यवस्था नसल्याने पर्यटकांनी या पर्यटन स्थळांकडे दुर्लक्ष केले आहे त्यामुळे विकास आराखडा तयार करण्यापूर्वी पाणी साठवण्याची सोय करा अशी मागणी माहे एप्रिल २०१५ मध्ये स्थानिक आमदारांनी विभागीय आयुक्तांच्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे व त्यासाठी पर्यटन विभागाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे,
(३) अद्याप पाणी योजनेच्या कामास सुरुवात झाली नसल्यास त्याची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१), (२) व (३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५/४/२०१५ च्या म्हैसमाळ-वेरुळ-खुलताबाद-सुलीभंजन पर्यटन विकास आराखड्याबाबतच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी या चारही स्थळांच्या पाण्याच्या गरजा विचारात घेऊन पाणी बजेट तयार करावे व त्यानुसार पाण्याचे नियोजन करण्याबाबत मुद्द मांडला. याबाबत विभागीय आयुक्तांनी पाणी बजेट बाबत नोडल यंत्रणा नेमून त्यांनी पाण्याशी निगडीत जलसंपदा, जलसंधारण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

जिल्हा परिषद, वन विभाग, भुजल सर्व्हेक्षण, कृषि विभाग अशा विविध यंत्रणांशी समन्वये साधून चारही स्थळांचे पाणी बजेट तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार चारही ठिकाणचे पाणी बजेटसाठी व पुढील अंमबजावणीसाठी कार्यकारी अभियंता (स्थानिक स्तर), जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांची नोडल यंत्रणा म्हणून नेमणकू करण्याचा बैठकीत निर्णय घेण्यात आला त्यानुसार कार्यकारी अभियंता (स्थानिक स्तर) यांनी पाण्याशी संबंधित वर उल्लेख केलेल्या सर्व यंत्रणांशी समन्वये साधून पाणी बजेट तयार करावे, अशा सुचना विभागीय आयुक्तांनी दिल्या आराखडा अंतिम झाल्यानंतर निधीची उपलब्धता व आराखड्याची अंमलबजावणी अपेक्षित आहे.

---

**औरंगाबाद शहरातील राज्यातील पहिल्या स्वतंत्र शासकीय विभागीय कॅन्सर हॉस्पिटलसाठी नियोजित स्वतंत्र जलवाहीनीबाबत**

**(२०) १८०४३ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील राज्यातील पहिल्या स्वतंत्र शासकीय विभागीय कॅन्सर हॉस्पिटलसाठी नियोजित स्वतंत्र जलवाहीनी शासनाने मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलवाहिनीचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने सुमोटो याचिका दाखल करून ज्युबली पार्कच्या जलकुंभापासुन टाकण्यात आलेल्या स्वतंत्र जलवाहिनीचे काम तीन महिन्यात पूर्ण करावे असे आदेश माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास औरंगाबाद महानगरपालिकेस दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिसेंबर नंतर ६ महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही जलवाहिनीचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत व त्यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद यांनी शासनाला सादर केलल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युबली पार्क मलकुंभ येथुन २०० व १५० मिमी व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकण्याच्या प्रस्तावास शासनाने दिनांक ०३/०६/२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) मा. उच्च न्यायालयाने उक्त काम निधी उपलब्धतेनंतर पुढील तीन महिन्यात पुर्ण करण्याबाबत आदेशीत केले आहे.

(३) व (४)

१. प्रस्तावाला शासनाने दिनांक ०३/०६/२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

२. अधिष्ठाता शासकीय कर्करोग रुग्णालय, यांचेकडून औरंगाबाद महानगरपालिकेस अद्यापही निधी उपलब्ध झालेला नाही. निधी उपलब्ध झाल्यानंतर औरंगाबाद महानरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**औरंगाबाद जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषीत करण्याच्या निर्णयबाबत**

**(२१) १८०४६ (२९-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हयातील जगप्रसिध्द अजिंठा, वेरुळ लेणी, बिबिका मकबरा, पानचक्की, औरंगाबाद लेणी, पितळखोरा लेणी, म्हैसमाळ, गौताळा, दौलताबाद, देवगिरी किल्ला, संत ज्ञानेश्वर उद्यान इत्यादी स्थळांचा पर्यटन स्थळात समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त स्थळांच्या विकासासाठी शासनाने किती निधी उपलब्ध करून दिला आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत औरंगाबाद जिल्हयाचा पर्यटन विकासाचा बृहत आराखडा तयार करण्यात आला असून, त्याची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या स्तरावर छाननी झालेली आहे. सदर आराखडयात बिबिका मकबरा,पाणचक्की, औरंगाबाद लेणी, पितळखोरा लेणी, गौताळा, दौलताबाद इत्यादी स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. सदर आराखडयाची शासन मान्यतेने कामांच्या प्राधान्यक्रमानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार अंमलबजावणी अपेक्षित आहे.

---

**राज्यातील बांधकाम तसेच घरेलू कामगार यांच्याकरीता कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(२२) १८२३१ (११-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.वैभव पिचड**

**(अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम तसेच घरेलू कामगारांची नोंदणी करून त्यांना कल्याणकारी योजनांचा प्रभावीपणे लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यासाठी राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज गतिमान करण्यासाठी दिनांक ३०.७.२०१४ च्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने बाह्य यंत्रणेद्वारे विभागीय कार्यालय, जिल्हा कार्यालय व मुबई कार्यालयामध्ये कंत्राटी पध्दतीवर कर्मचा-यांची भरती करण्यात आलेली आहे.

राज्यातील घरेलू कामगारांची नोंदणी करुन त्यांना कल्याणकारी योजनेचा लाभ देण्यासाठी दिनांक १२.८.२०११ रोजी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. त्यामुळे दिनंक २७.३.२०१५ च्या अधिनियमान्वये विकास आयुक्त (असंघटित कामगार), महाराष्ट राज्य, मुंबई यांचे एक सदस्यीय मंडळ गठित झालेले आहे. तसेच, घरेलू कामगार कल्याण मंडळासाठी पद निर्मिती बाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुरुड तालुक्यातील (जि.रायगड) शिरगांव येथील श्री.कृष्णा सातमकर व त्यांच्या कुटुंबियांवर टाकलेल्या बहिष्काराबाबत

**(२३) १८३७८ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड तालुक्यातील (जि.रायगड) शिरगांव येथील श्री.कृष्णा सातमकर व त्यांच्या कुटुंबियांवर टाकलेल्या बहिष्काराबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर पोलीस अधिक्षक व पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी ग्रामपंचायत अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य यांचेसोबत चर्चा करुन वाळीत प्रकरण मिटविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाळीत प्रकरण अद्याप न मिटता परत तसेच सुरु आहे अशा प्रकारची तक्रार श्री. कृष्णा सातमकर यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) अर्जदार यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीसाठी अर्जदारास दिनांक १९ एप्रिल, २०१५ व दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी बोलविले होते. परंतु अर्जदार त्यावेळी पोलीस स्टेशनाला हजर राहिले नाहीत. तसेच अर्जदार यांना फोनवरुन दिनांक १२ मे, २०१५ रोजी संपर्क साधून सदर अर्जाच्या चौकशीसाठी हजर राहण्याची समज दिली असता त्यांनी हजर राहू शकत नसल्याबाबत कळविले. यावरुन अर्जदार यांना त्यांनी केलेल्या तक्रारीत स्वारस्य वाटत नसल्याने सदरचा अर्ज फाईल होण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग यांच्याकडे सादर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांना घरासमोर केलेल्या अतिक्रमणावरुन प्रस्तुतचा वाद झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पर्यटन स्थळांच्या सुशोभिकरणासाठीच्या आराखडयाबाबत**

**(२४) १८४०८ (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंबोळगड, यशवंतगड, धोपश्वर, गंगातीर्थक्षेत्र, गरम पाण्याचा झरा, चुनाकोळवण, राजापूरची गढी, रानतळे परिसर या आठ पर्यटनस्थळांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पर्यटन स्थळांच्या सुशोभिकरणासाठी आराखडा तयार करण्याचे काम दोन वर्षांपासून सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा आराखडा शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास या आराखड्याचे स्वरुप काय आहे,
(४) आराखडा शासनास सादर केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१) नाही. तथापि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या निदेशानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरीमार्फत रत्नागिरी जिल्ह्यासाठीचा पर्यटन विषयक बृहद् आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यामध्ये प्रश्नोत्त आठ पर्यटन क्षेत्रापैकी राजापूरची गढी वगळून उर्वरित सात पर्यटन क्षेत्रांचा समावेश आहे.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या स्तरावर छाननी करण्यात आली. या आराखड्याबाबत सचिव, पर्यटन यांनी सर्व संबंधितांची बैठक घेतली आहे. बैठकीत सदर आराखड्याबाबत संबंधित अधिका-यांना निदेश देण्यात आलेले आहेत.

---

**नाशिक पंचवटी येथील एका महाविद्यालयासमोर असलेल्या हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय चालत असल्याचा संशय व्यक्त करुन छापा टाकल्याबाबत**

**(२५) १८६०५ (१२-०८-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पंचवटी येथील एका महाविद्यालयासमोर असलेल्या हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय चालत असल्याचा एका स्थानिक लोकप्रतिनिधीने संशय व्यक्त करुन छापा टाकून हॉटेलमध्ये वास्तव्यास असलेल्या पती - पत्नीला त्रास दिल्याची घटना दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :**(१) दि. २०.४.२०१५ रोजी सदर घटना घडली.

(२) सदर प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता ते जोडपे पती-पत्नी असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

(३) संबंधीत जोडप्याने आमची कोणाविरुध्द तक्रार नसलेचे सांगितले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माव्हेवाड कोंडुरा भागात राहणा-या एका दांपत्याने आपल्या चार महिन्याच्या मुलाला अवघ्या ५ हजार रुपयास विकल्याबाबत

**(२६) १८९४२ (१०-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माव्हेवाड कोंडुरा भागात राहणा-या एका दांपत्याने आपल्या चार महिन्याच्या मुलाला अवघ्या ५ हजार रुपयास विकल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) सदर प्रकरणी मळेवाड कोडूरा भागात राहणाऱ्या सावंत दांपत्याकडे चौकशी केली असता या दांपत्याने आंतरजातीय विवाह केला असल्याने ते मोजमजुरीचे काम करुन उदरनिर्वाह करत होते. त्यांच्याकडून मुलाच्या पालनपोषणाची व्यवस्था होत नसल्यामुळे त्यांनी बांदा शेले येथे राहणाऱ्या मेस्त्री कुटुंबाकडे त्या मुलाला पालनपोषणाकरिता ठेवलेला असुन ते त्यांचे पालनपोषण करत आहे.

सदर मुलाला विकलेला नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत

**(२७) १८९५७ (१२-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात दारु, मटका, जुगाराचे प्रमाण वाढले असतांनाच मुलींची व महिलांची छेडछाडीचे प्रकार वाढल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) सावंतवाडी पोलीस ठाणेच्या हद्दीत आतापर्यंत दारुबंदी सदराखाली २१ ठिकाणी छापे टाकण्यात आले असून ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर गुन्ह्यामध्ये १३ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रु. १२,३०,०००/- चौ १०८लीटर दारु व वाहने जप्त करण्यात आली आहेत.

मटका जुगार सदराखाली ३ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर गुन्ह्यांमध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रु. २,६७०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

सावंतवाडी तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी याकरीता अवैध धंदे नष्ट करण्याच्या उद्देशाने तसेच मुलींची छेडाछाड होऊ नये म्हणून गर्दीच्या ठिकाणी पोलीस फिक्स पॉईट तसेच दिवसा व रात्री सक्त मस्त घालण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) चिंचवली येथील जमीन बनावट मालक समोर करुन विकण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(२८) १९५२७ (१०-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) चिंचवली येथील १७ एकर जमीन बनावट मालक समोर करून विकण्याचा प्रयत्न होत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलापूर-बेलवली भागातील तुषार भगवान पाटील आणि स्नेहल महेंद्र पवार यांची सामायिक भागिदारी असलेल्या टीएसपी ग्रुप अंधेरी, मुंबई येथील मेहताब शाईन शेख यांची जमीन खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नेरुळ पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय.

(४) सदर प्रकरणी नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५२/२०१५ भा.दं.वि. कलम ४५६, ४६७, ४७१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाअंती सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैभव इंडस्ट्रियल इस्टेट येथील अनधिकृत पार्किगबाबत**

**(२९) १९६४६ (१२-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभव इंडस्ट्रियल इस्टेट येथील अनधिकृत पार्किगबाबत लोकप्रतिनिधींनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतुक पोलिस, अणुशक्तीनगर, मानखुर्द यांना दिनांक ४ मे, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने ट्रॉम्बे वाहतूक विभागाकडून दि. ४.८.२०१५ ते दि.१८.८.२०१५ या कालावधीत २६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली असून सतत कारवाई करण्यात येत आहे. तसेच, वैभव इंडस्ट्रियल इस्टेट येथील रस्त्यांवर कोणतीही इसम पार्किंग, अंघोळ अथवा प्रात: विधी करणार नाही त्यासाठी गोवंडी पोलीस ठाण्याहून योग्य ती खबरदारी घेण्यात आली आहे. अशी कृत्ये व रहदारीस अडथळा निर्माण केल्यास त्यांच्या वर योग्य ती कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सरकारी नोकर भरती बंदीच्या निर्णयाबाबत**

**(३०) १९६८३ (१०-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सरकारी नोकर भरती बंदच्या धोरणामुळे राज्यात घेतल्या जाणा-या स्पर्धा परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अद्यापही शासकीय सेवा करण्याचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणामुळे या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची वय शासकीय नोकरीच्या मर्यादेपेक्षा जास्त झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या विद्यार्थ्यांना बेरोजगारीमुळे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्साय, नोकर भरती बंदीच्या निर्णयाबाबत शासन फेरविचार करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

शासकीय विभाग/कार्यालयातील गट-अ ते गट-ड संवर्गात पदभरतीवर अंशत: निर्बंध वित्त विभागाच्या दि.२.६.२०१५ व दि.२३.९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घालण्यात आले आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१६.०७.२०१५ अन्वये दि.०२.०६.२०१५ पूर्वी ज्या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश निर्गमित झाले आहेत व खुल्या गटातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. मात्र आरक्षणातील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी नंतर पुर्ण झालेली असेल त्याचप्रमाणे ज्या प्रकरणी मागणीपत्र पाठवून उमेदवारांच्या शिफारशी आयोगाकडून/जिल्हा निवड समित्यांकडून विभागास/ नियुक्ती प्राधिका-यास प्राप्त झाल्या आहेत, पदभरतीसाठी पदांची मागणी निवडसमित्यांना/आयोगास दि.०२.०६.२०१५ पूर्वी पाठविली असेल व त्याअनुषंगाने दि.१६.०७.२०१५ पर्यत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे अशा जाहिरातीत नमूद करण्यात आलेली पदे भरण्यास प्रशासकीय विभागांना पुर्णत: मुभा दिलेली आहे. याखेरीज दि.०२.०६.२०१५ पूर्वी मागणीपत्र पाठविले असेल परंतु मागणीपत्राच्या अनुषंगाने दि.१६.०७.२०१५ पर्यत जाहिरात प्रसिध्द झाली नसल्यास अशा प्रकरणी पद मागणीबाबत पुर्नविचार करुन आवश्यक प्रस्ताव अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या समितीसमोर सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसार पदे भरण्याची आवश्यकता विचारात घेऊन समिती अधिक पदे भरण्यास मंजूरी देत असते, त्यामुळे पदे भरण्याची कार्यपध्दती पुर्णपणे बंद नसल्याचे दिसते. यावरुन शासकीय सेवेत शासनाच्या धोरणानुसार परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे वय शासकीय सेवेत येण्यासाठी विहित केलेल्या वयोमर्यादेपेक्षा जास्त झाले अथवा विद्यार्थ्यांना बेरोजगारीमुळे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नाही असे म्हणता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील चुनाभट्टी-सायन येथील सोमय्या ट्रस्टच्या मैदानावर हिंदुधर्म विरोधी धर्मांतर विषयी भाषणे करण्यात आल्याबाबत**

**(३१) २०५५० (१०-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.श्याम किशोर व पॉल दिनकरन या इसमांनी दिनांक १२ फेब्रुवारी २०१४ रोजी मुंबईतील चुनाभट्टी-सायन येथील सोमय्या ट्रस्टच्या मैदानावर हिंदुधर्म विरोधी धर्मांतर विषयी भाषणे दिल्यामुळे त्यांच्या विरोधात ड्रग्ज अॅड मॅजिक रिमेडीज अॅक्ट १९५४ आणि नरबळी आणि जादूटोणा कायदा २०१३ या कायद्यातील तरतूदीनुसार कडक कारवाई करावी अशा आशयाच्या तक्रारी श्री. चंद्रकांत भदिर्के आणि श्री.गोविंद यांनी ठाणे अंमलदार, वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय?

(२) असल्यास या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.चंद्रकांत भदिर्के व श्री. महेश गोळे यांनी एकाच आशयाचा तक्रार अर्ज वडाळा टीटी पोलीस ठाणे येथे केला असून, त्यानुसार पोलीस ठाणे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. तरंतु संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही. अर्जदार हे चौकशी कामी पोलीस ठाणेस हजर न राहिल्याने त्यांना जा.क्र.९१८१/१४, दि.२४.०६.२०१४ व पुन्हा जा.क्र.११५४४/१४, दिनांक २०.०८.२०१४ रोजी त्यांचे पत्त्यावर नमूद अंमलदार गेले असता श्री.गोळे हे मिळून न आल्याने त्यांचे घराशेजारच्या महिलेकडे अर्जदार यांचेबाबत चौकशी केली असता ते त्यांचे मूळगावी गेले असल्याचे सांगितले. श्री.गोळे यांना वारंवार त्यांचे दुरध्वनीवरुन संपर्क साधून व लेखी पत्राद्वारे कळवून देखल ते वडाळा पोलीस ठाणेस त्यांचे तक्रारीच्या अनुषंगाने हजर न राहिल्याने त्यांना त्यांच्या अर्जामध्ये काही स्वारस्य नसल्याचे समजून तक्रारी अर्ज वडाळा पोलीस ठाणे येथे दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर तालुक्यात एमएमआरडीएकडून रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याबाबत

**(३२) २०९५० (११-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर तालुक्यात एमएमआरडीएकडून रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे चालू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण भागात काही कामे चालू असुन अर्धवट अवस्थेत असल्याने नागरिकांचे प्रचंड प्रमाणात हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. जागा उपलब्ध झालेल्या ठिकाणी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत**

**(३३) २०९८७ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, पर्यटन मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक सातत्याने करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१) प्रश्नाधिन स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तसेच एखाद्या तालुक्यास पर्यटनक्षेत्र घोषित करण्याचे धोरण नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात पर्यटनास चालना देण्याबाबत**

**(३४) २११०३ (१२-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा मुख्यालयाच्या ८० कि.मी. परिघात अनेक जागतिक दर्जाची पर्यटन क्षेत्रे असल्याने सदर ठिकाणी पर्यटनास चालना देण्यासाठी विकास आराखडा तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा येथे पर्यटक निवास उभारण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) दि.४/११/२०१० च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेमार्फत बुलढाणा जिल्ह्याचा रु.३७०.०० कोटीचा पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याची महामंडळास्तरावर छाननी झाली आहे. सदर आराखड्यात बुलढाणा जिल्हयातील पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. आराखडा अंतिमत: मान्य झाल्यावर आराखड्याची कामाच्या प्राधान्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार अंमलबवणी अपेक्षित आहे.

---

**नवी मुंबई क्षेत्रात गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्यामुळे पोलीस दलाची संख्या वाढविण्याबाबत**

**(३५) २११७७ (१०-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात असलेली आशिया खंडातील सर्वात मोठी कृषि उत्पन्न बाजार समिती, जेएनपीटी सारखे भव्य बंदर नवी मुंबई शहर मुंबईला लागूनच असल्यामुळे नवी मुंबई शहर वर्दळीचे शहर बनले असून चोऱ्या, लुटमार, घरफोडी, चैन स्नॅचिंग इत्यादी स्वरुपाचे गुन्हे दिवसाढवळ्या घडत असणे, या प्रकारांना प्रतिबंध बसावा व शहरातील कायदा सुव्यवस्था चोख राहावी यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात नवी मुंबई पोलीस दलाची संख्या वाढवावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालिन गृहमंत्र्यांना वेळोवेळी तसेच विद्यमान मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१५) :** (१) होय.

(२) राज्य पोलीस दलातील ६१४९४ पदनिर्मितीच्या पुढील टप्प्यात विविध संवर्गात काही पदे निर्माण करावयाचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दांटीआवार व गवंडीवाडा (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथे भेसळयुक्त दारु विकणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३६) २१६९५ (१०-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दांटीआवार व गवंडीवाडा (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) या भागात भेसळयुक्त दारु विकणा-यांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन मालवण तालुका ट्रॉलर चालक-मालक संघटना आणि मासळी विक्री एजंट संघटनेने मा.पालकमंत्री, मा.जिल्हा पोलीस अधिक्षक व मालवण पोलीस निरिक्षक यांना माहे एप्रिल २०१५ मध्ये दिले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, यापूर्वीही गोव्यातून मालवण येथे आणलेली भेसळयुक्त दारु पिऊन काही जणांचा मृत्यु झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भेसळयुक्त दारु विकणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सदर प्रकरणी, चौकशी केली असता भेसळयुक्त दारु विक्री करणारे निष्पन्न झाले नाहीत. भेसळयुक्त दारुची विक्री केली जाणार नाही यासाठी वेळोवेळी गस्त घालून माहिती काढण्यात येते व त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. तसेच भेसळयुक्त दारुची विक्री होणार नाही. याची दक्षता घेण्यात येते.

मालवण पोलीस ठाणे हद्दीत ४ ठिकाणी छापे टाकून ९० लिटर गोवा बनावटीची दारु व २८ लिटर एवढी हातभट्टीची दारु जप्त करण्यात आली असून सदर प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर जप्त दारुचे नमुने तपासणीसाठी केमीकल ॲनेलायझर पुणे येथे पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने विविध व्यवसायांमधील शिक्षकांची १ हजार रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) २१७०२ (३०-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने विविध व्यवसायांमधील शिक्षकांची १ हजार रिक्त पदे भरण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान जाहिरात दिली असतानाही माहे मे, २०१५ पर्यंत उक्त रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, तद्‌नुसार भरती प्रक्रिया पूर्ण होण्यास होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्याकरिता महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचे सहाय्य घेण्यात येत असून त्यांचेसमवेत करर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) लागू नाही.

---

**दौंड तालुक्यातील यवत व इंदापूर (जि.पुणे) या पोलीस ठाण्यामधून पोलिसांच्या ताब्यात असलेले आरोपी पळून गेल्याबाबत**

**(३८) २१९३९ (१२-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील यवत व इंदापूर (जि.पुणे) या पोलीस ठाण्यामधून पोलिसांच्या ताब्यात असलेले आरोपी पळून गेल्याची घटना दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान घडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती काय निदर्शनास आले व तदनंतर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी यवत पोलीस स्टेशन येथील तात्पुरत्या लॉकअपमध्ये ठेवलेला आरोपी लॉकअपच्या छतास असलेल्या दोन लोखंडी गजांमध्ये असलेल्या गॅपमधून पळून गेला. पळून गेलेल्या आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन यवत येथे गु.र.क्र. १२५/२०१५, भा.दं.वि. कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

प्राथमिक चौकशीअंती एका पोलीस कर्मचाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाच्या कालावधीसाठी का रोखण्यात येऊ नये व दुसऱ्या कर्मचाऱ्याला रु. ५,०००/- दंडाची शिक्षा का करण्यात येवू नये, याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

इंद्रापूर पोलीस स्टेशन मधून देखील एक आरोपी पळून गेला असल्याने त्यांच्याविरुध्द गु.र.क्र. १४२/२०१५, भा.दं.वि. कलम २२४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व सदर आरोपी पळून जाण्यास जबाबदार असलेल्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून याबाबतची प्राथमिक चौकशी चालू आहे.

पळून गेलेल्या आरोपींच्या तपासासाठी वेगवेगळी पथके स्थापन करण्यात आली असून त्याबाबतचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३९) २२०७८ (१२-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर**

**कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मागील सहा महिन्यात गुन्हेगारीच्या घटनेत मोठया प्रमाणात वाढ झाली असून घरफोडी, अपहरण, बलात्कार, विनयभंग, हत्या, वसुली, चेन स्नॅचींग, कैदी पळून जाणे अशा घटना घडत असल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र अंसतोषाची भावना निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांचा गुन्हेगारांवर वचक नसल्याने सदर घटना होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हेगारीवर वचक ठेवण्याकरीता कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत घडणा-या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गस्त पथकांची वाढ करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिका-यांनी देखील गस्त घालावी व त्या दरम्यान हजर असलेल्या कर्मचा-यांना देखील वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. याबाबत पोलीस आयुक्त आणि पोलीस सह आयुक्त दररोज आढावा घेत आहेत.

गुन्हेशाखेच्या नियंत्रणात ४० कर्मचा-यांचे विशेष पथक, शस्त्र, वॉकी-टॉकी, मोटार सायकलसह दिवस-रात्र दोन पाळीत गस्त लावण्यात येत आहे. सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हेशाखा नागपूर शहर येथून दररोज ३ जिप गाड्या ज्यामध्ये पोलीसांची (महिला पोलीससह) गस्त लावण्यात येत आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त हे महत्त्वाचे वेळी स्वतः गस्तीवरील पोलीस कर्मचा-यांची पाहणी करतात. तसेच नव्याने २३ पोलीस वाहने (पोलीस गस्तीपथक) लोकसदृश अशा महत्वाचे ठिकाणी नेमण्यात येऊन त्यास नजिकचे संवेदनशील ठिकाणी गस्तीकरीता पाठविण्यात येत आहे.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत संकटात सापडलेल्या नागरीकांना तात्काळ मदत करण्यासाठी आयवॉच पोलीस ॲप सुरु करण्यात आले आहे. नागपूर शहरातून १७ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. नागपूर शहरात मोका अंतर्गत ५७ गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे.

सामाजिक सुरक्षा शाखेत एक विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असून मुसकान योजना कार्यान्वित करण्यात आली आह, याअंतर्गत १६ मुले, ६५ मुली, १०७ पुरुष व ११५ महिलांना मिसींग प्रकरणात शोध घेऊन त्यांच्या घरी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**येरवडा कारागृहातील (जि.पुणे) कैद्यांना मनीऑर्डरद्वारे मिळणा-या दोन हजार रुपये व्यतिरिक्त अधिक रक्कम पोचविण्यात येत असल्याबाबत**

**(४०) २२३०६ (१०-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा कारागृहातील (जि.पुणे) कैद्यांना दरमहा मनीऑर्डरद्वारे आलेल्या फक्त दोन हजार रुपये खर्च करण्याची परवानगी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापेक्षा जास्त रक्कम असल्यास तीस टक्के रक्कम तुरुंग रक्षकांना देऊन हजारो रुपये कैद्यांपर्यंत पोचविण्याची थेट सेवा सुरु असल्याची बाब दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारागृहातील उपहारगृहात प्रत्येक कैद्याला वस्तू घेण्यासाठी काळाबाजाराने कूपन्सची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, दोषी सुरक्षा रक्षकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. कारण मा. कारागृह महानिरीक्षक यांचे परिपत्रक जा.क्र.आस्था/ अभिलेखशाखा /कॅ.कुपन्स/४२३३/२०१० कक्ष-१(१), पुणे-०१, दि. ०१/०६/२०१० अन्वये महाराष्ट्रातील सर्व कारागृहामध्ये कुपन पध्दती बंद करुन बंद्यांच्या मागणीनुसार बंद्यांच्या खाजगी हक्क व बंदी वेतन (कामाचा मोबदला) अनुक्रमे रजिस्टर क्र. १.२ व रजि क्र. २६ या नोंदवही मध्ये खर्चाची नोंद घेतल्यानंतर उपहारगृहातुन बंदी यांनी केलेल्या मागणीनुसार खर्च रकमेच्या किंमतीची वस्तू बंद्यांच्या ताब्यात देऊन वस्तु मिळाल्याची स्वाक्षरी घेण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोलामध्ये एका बांधकाम व्यावसायिकाने बनावट दस्तऐवज व खोट्या स्वाक्ष-या करुन कोट्यवधीचा व्यवहार केल्याबाबत**

**(४१) २३०९७ (१०-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोलामध्ये एका बांधकाम व्यावसायिकाने एका महिलेच्या शेतीचे सर्वे नं. ३/९ बनावट दस्तऐवज करुन व खोट्या स्वाक्ष-या करुन कोट्यवधी रुपये मालकीची खरेदी विक्रीच्या व्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर महिलेने शहर कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शेतीच खरेदी-विक्रीचा व्यवहार दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ ते दिनांक २१ मार्च, २०१३ या कालावधीत करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार फसवणूक करणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय.
(४) या प्रकरणी सरिता चंद्रशेखर सुंदरबंशी यांनी केलेल्या तक्रारीवरुन तसेच मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र.२, अकोला यांचे सी.आर.पी.सी. कलम १५६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेशावरुन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी गु.र.क्र. ३०/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, १९५, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या तपासामध्ये मा.जिल्हा व सत्र न्यायाधीश अकोला यांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी स्थगिती आदेश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटनबोरी (ता.केळकर, जि.यवतमाळ) गावातील कु. योगीता नागोराव सिडाम या युवतीचा खून झाल्याबाबत**

**(४२) २३४५८ (१०-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटनबोरी (ता.केळकर, जि.यवतमाळ) गावातील कु. योगीता नागोराव सिडाम या युवतीचा दिनांक ३० मार्च २०१५ रोजी खून झाल्या प्रकरणी अजूनही आरोपीना अटक करण्यात पोलीसांना यश न आल्याची बाब दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी सद्य:स्थिती काय आहे, तसेच पोलीस प्रशासनाच्या अपयशानंतर सदर प्रकरण सी.बी. आय कडे सोपविण्यात आले आहे काय,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे गु.र.क्र. ६०/२०१५ भा.दं.वि. कलम ३०१, ३०२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून खून झाल्याप्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु असून आरोपीची तसेच मृत युवतीच्या नातेवाईकांची नार्को टेस्ट झाल्यानंतर उपलब्ध पुराव्याच्या आधारे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात येईल. या प्रकरणी पोलीसांना अपयश आलेले नसल्यामुळे गुन्ह्याचा तपास अद्यापर्यंत सीबीआयकडे सोपविण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात किमान कौशल्य विकास कार्यालयाअंतर्गत सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळण्याबाबत**

**(४३) २३६३८ (११-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात किमान कौशल्य विकास कार्यालयाअंतर्गत (रोजगार - स्वयंरोजगार) विभागाचे वर्षभरात सर्वच घटकातील बेरोजगारांना केवळ ४४७ उमेदवारालाच नोकरी मिळाली असल्याची बाब दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कार्यालयाअंतर्गत नोंदणी वर्गनिहाय व शैक्षणिकनिहाय किती नोंदणी झाली व किती बेरोजगारांनी नोंदणी केली व किती उमेदवारांना कार्यालयाचे माध्यमातून नोकरी मिळाली या बाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी व बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते प्रयत्न केले आहे वा कसे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद येथे सन २०१५ मध्ये जून, २०१५ अखेर झालेली वर्गनिहाय नोंदणी व शिक्षण निहाय नोंदणी खालीलप्रमाणे आहे.

| **वर्ग** | **नाव नोंदणी** |
|---|---|
| अनुसूचित जाती | २९,०२६ |
| अनुसूचित जमाती | १,८६० |
| भटक्या जमाती | ९,४९३ |
| विमुक्त जाती | ४,८६८ |
| विशेष मागास प्रवर्ग | ७२० |
| इतर मागासवर्गीय | १६,०६१ |
| सर्वसाधारण | ६४,७७७ |

| **शैक्षणिक पात्रता** | **आकडेवारी** |
|---|---|
| एस.एस.सी.पेक्षा कमी शिकलेले | ५,४४५ |
| एस.एस.सी.पास | ४०,७५३ |
| एच.एस.सी.पास | ३६,८४८ |
| अभियांत्रिकी/पदवीधारक | ७,१७३ |
| आय.टी.आय. | ४,१३३ |
| शिकाऊ कायद्या खालील प्रशिक्षित | ७९७ |
| पदवीधर | २६,००९ |
| पदव्युत्तर | ५,६४७ |
| एकूण | १२६,८०५ |

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र औरंगाबाद येथे सन २०१५ मध्ये जून, २०१५ अखेर पर्यंत ६९९२ उमेदवारांनी नावनोंदणी केली आहे. तर सदर कार्यालयातून १,४०५ उमेदवारांना जून, २०१५ अखेर पर्यंत नोकऱ्या मिळाल्या आहेत. राज्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून राज्य शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत रोजगार मेळावे, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना, आदिवासी उमेदवारांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र या योजना राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा येथे मिसबाह कांद्री या तरुणीला मुस्लिम असल्याच्या कारणावरुन बिल्डरने घर भाड्याने देण्यास नकार दिल्याबाबत**

**(४४) २४६६६ (१२-०८-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथे गुजरात येथून नोकरीसाठी आलेल्या मिसबाह कांद्री या तरुणीने

बिल्डरला २४ हजार रुपयांचे डिपॉझिट देवूनही मुस्लिम असल्याच्या कारणावरुन बिल्डरने घर भाड्याने देण्यास नकार दिल्याचा प्रकार माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित बिल्डरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी सदरहू इमारतीतील १३ रहिवाशी व भाडेकरुंची चौकशी केली असता त्यांनी सदर बिल्डींगमध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहत असल्याचे व त्यांना रुम भाड्याने किंवा विकत घेताना जात धर्माबाबत विचारणा झाली नसल्याचे किंवा त्यांना कोणतीही अडचण आली नसल्याचे सांगितले.
संबंधितांना लेखी पत्र देऊनही ते चौकशीकरीता पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे तक्रारीत कोणत्याही प्रकारचे तथ्य नसल्याचे आढळून आलेले आहे.

---

**मौजे वाढव बुद्रुक ( ता.अलिबाग जि. रायगड) येथे निरुपणकार तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारक बांधण्याबाबत**

**(४५) २५०२५ (१४-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाढव बुद्रुक ता.अलिबाग येथे महाराष्ट्र भुषण ज्येष्ठ निरुपणकार तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारक बांधण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) शासनाने उपलब्ध केलेल्या जमिनीसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झालेली असून मा.सर्वोच्च न्यायालयाने “जैसे थे” (status-quo) असे आदेश दिलेले आहेत. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने स्मारकाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही होऊ शकली नाही.

---

**नागपूर येथे दाखल्यांच्या दलाली प्रकरणात सात दलालांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत**

**(४६) २५८१६ (१२-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील सेतू आणि तहसिल कार्यालय परिसरात दाखल्यांच्या दलाली प्रकरणात सात दलालांवर पोलिस ठाण्यात माहे जून, २०१५ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दलालासोबत उपजिल्हाधिका-यांचेही संबंध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१५) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील सेतू आणि तहसिल कार्यालय परिसरात दाखल्यांच्या दलाली प्रकरणात दोन दलालांवर जून २०१५ मध्ये व पाच दलालांवर जुलै, २०१५ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी सह जिल्हानिबंधक, उपायुक्त सदस्य, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती व नगर भुमापक अधिकारी, नागपूर यांनी केलेल्या तक्रारीवरुन जिल्हाधिकारी कार्यालयात कोणतेही काम नसताना ओळखपत्र तसेच परवाना नसताना अनधिकृत सरकारी जागेत प्रवेश केल्याने पाच आरोपींना अटक करण्यात आली असून पोलीस स्टेशन सदर, नागपूर येथे एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(१) गु.र.क्र. १९२/२०१५, मुंबई पोलीस कायदा कलम १२०

(२) गु.र.क्र. १९३/२०१५, मुंबई पोलीस कायदा कलम १२०

(३) गु.र.क्र. १९५/२०१५, मुंबई पोलीस कायदा कलम १२०

व सदर प्रकरणी कोर्टात प्रतिवृत्त सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुळाणी व वरुडे (ता.खेड, जि.पुणे) परिसरात असलेल्या शेतक-यांच्या शेतातील ५०० फळझाडांची तोड केल्याबाबत**

**(४७) २६०६० (१२-०८-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुळाणी व वरुडे (ता.खेड, जि.पुणे) परिसरात असलेल्या शेतक-यांच्या शेतातील ५०० फळझाडांची माहे जून, २०१५ मध्ये अज्ञात व्यक्तींनी तोड केल्याची तक्रार स्थानिक पोलीस स्थानकात व कृषी अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शेतक-यांना न्याय मिळावा म्हणून आतापर्यंत चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :** (१) गुळाणी व वरुडे (ता.खेड, जि.पुणे) परिसरात असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील ५०० फळझाडांची माहे जून, २०१५ मध्ये अज्ञात व्यक्तींनी तोड केल्याची तक्रार खेड पोलीस स्थानकात दाखल करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी शेतात अनाधिकाराने प्रवेश करुन शेवग्याची ५०० झाडे, पपईची १०० झाडे व मिरचीची २०० झाडे कापून तसेच पाणी तोडून नुकसान केल्याबाबतची तक्रार खेड पोलीस स्थानकात फिर्यादीने दिल्यावर खेड पोलीस स्थानक येथे भाग ५ गु.र.क्र.१७२/२०१५, भा.दं.वि. कलम ४४७, ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली होती. तथापि, त्यांना जामिनावर सोडण्यात आले आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी येथील जिल्हा विशेष कारागृहाच्या भिंतीवरुन कैदी पळून जाण्याच्या घटनेत वाढ झाल्याबाबत

**(४८) २६२३५ (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी येथील जिल्हा विशेष कारागृहाच्या भिंतीवरुन कैदी पळून जाण्याच्या घटना वाढल्याने नव्याने संरक्षक भिंत बांधण्याचा प्रस्ताव दीड वर्षापूर्वी शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारागृहाची सुरक्षा भक्कम नसल्यामुळे शिक्षा झालेल्या कैद्यांना कोल्हापूर, सांगली येथील कारागृहात वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१५) :**(१) रत्नागिरी विशेष कारगृहाची तटभिंत ही सुरक्षेच्या दृष्टीने भक्कम नसल्यामुळे सदर संरक्षक भिंत दुरुस्ती करणे (रंगकाम व गिलावा करणे) बाबतचे रु. ११,९१,०००/- च्या अंदाजपत्रकास अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे स्तरावरुन दिनांक ११/०९/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे,
(२) होय,

दक्षिण विभागातील सर्व कारागृहातील ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा झालेल्या बंद्यांना नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे वर्ग करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचांदूर (ता.कोरपणा, जि.चंद्रपूर) येथीज जमीन खरेदी-विक्री व्यवसायिकांच्या घरावरील गोळीबार करणाऱ्या मुख्य आरोपीस अटक करण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४९) २६४०७ (१२-०८-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचांदूर (ता.कोरपणा,जि.चंद्रपूर) येथील जमिन खरेदी-विक्री व्यावसायिक अरविंद ऊर्फ अरुण तुकाराम डोहे यांच्या घरावर दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी गोळीबार झाला, तसेच दिनांक २२ एप्रिल, २०१५ त्यांचे चुलत भाऊ अविनाश डोहे रा.कवढाळा,ता.कोरपणा यांचे ही घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी, २०१५ पासुन या दोन्ही कुटुंबियांना खंडणी मिळण्याकरीता भ्रमणध्वनी करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार पाेलीस स्टेशन गडचांदूरला करण्यात आली असता सबंधीत पोलिस अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यास व गोळीबारातील मुख्य आरोपीला अटक करण्यास टाळाटाळ होत असल्याची तक्रार पिडीतांकडून करण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे कारणे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :**(१) गडचांदुर (ता.कोरपणा, जि.चंद्रपूर) येथील जमीन खरेदी-विक्री व्यावसायिक अरविंद ऊर्फ तुकाराम डोहे यांच्या घरावर दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी गोळीबार झाला, हे खरे आहे काय,

तसेच दिनांक २२ एप्रिल, २०१५ त्यांचे चुलत भाऊ अविनाश डोहे रा.कवढाळा, ता.कोरपणा यांचेही घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला, हे खरे नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) सदर प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, गडचांदूर येथे गु.र.क्र. २८/२०१५, भा.दं.वि. कलम ३०७, ३८५, ३८७, १२० (ब) सह कलम आर्म ॲक्ट ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणी तक्रार प्राप्त होताच पोलीसांनी लगेच घटनास्थळी जाऊन सदर प्रकरणाची चौकशी केली व घराशेजारील लोकांनी व काही साक्षीदारांनी दिलेल्या माहितीवरुन दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून देशी बनावटी पिस्तूल, काडतूसाच्या पुंगळ्या व बुलेट जप्त करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माणगांव तालुक्यातील (जि.रायगड) मौजे भाले या जमिनधारकाची फसवणूक केल्याबाबत**

**(५०) २६५०८ (१२-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव तालुक्यातील (जि.रायगड) मौजे भाले या गावातील गट नं ९१:८ क्षेत्र हे आर ४:९४.० आकार रु.१.५० (रा.भले) यांच्या मालकीची असताना त्यांच्या नावाने दीपक नरे या तोतया व्यक्तीला दुय्यम निबंधक कार्यालयात उभे करुन खोटे बनावट निवडणूक ओळखपत्र तसेच बँकेत बनावट खाते उघडून बनावट सरकारी दस्तावेज तयार करुन तब्बल ३५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी सात जणांविरुध्द माणगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१५) :**(१) होय.

(२) सदर प्रकरणी श्री.मनिष झुनझुनवाला यांनी सात जणांविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन माणगांव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६२/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४१९, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**      **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.**      **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.